ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबींबाबत...

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन परिपत्रक** क्रमांक: ग्रापायो १११२/ प्र. क्र.१११/पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. १९ जुलै, २०१२

**वाचा :** शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.१७/३/२०१०

**प्रस्तावना:**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे विविध बैठकांच्या दरम्यान, योजनांना मान्यता देताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत सूचना दिल्या जातात. या सूचनांच्याआधारे कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद यांच्या कडून मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांच्याकडे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले जातात. या प्रस्तावांना एकतर मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांच्याकडून प्रशासकीय मान्यता दिली जाते अथवा त्यांची छाननी करुन ते प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले जातात.तथापि,याबाबत असे निदर्शनास आले आहे की,मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची केली जाणारी छाननी पर्याप्तपणे होत नाही अथवा बरेचदा घाईने केली जाते.तसेच ब-याच जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची परिणामकारक व वस्तुनिष्ठ छाननी करण्यासाठी मार्गदर्शन करण्याची विनंती शासनास केली आहे.

२. नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव तयार करीत असताना तसेच सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार करीत असताना, त्याचप्रमाणे दरडोई खर्चाच्या निकषाच्या बाहेरील योजनांचे प्रस्ताव तयार करीत असताना, आवश्यक त्या बाबींची छाननी वस्तुनिष्ठपणे करण्याची आवश्यकता असते. मात्र, असे न केल्याने, योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करताना अथवा ते शासनाच्या मान्यतेसाठी सादर केल्यावर पर्याप्त माहित्ती अभावी पुन्हा क्षेत्रीय कार्यालयांना विचारणा करावी लागते.त्यामुळे शासन स्तवरावर मान्यतेची कार्यवाही करण्यास अनावश्यक दिरंगाई होते. यासाठी जिल्हा परिषद स्तरावर **मुख्य कार्यकारी अधिका-यांनी** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव तयार करताना, त्यांची छाननी (अतांत्रिक) करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :

नवीन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव तयार करीत असताना, प्रशासकीय मान्यता देताना तसेच सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार करीत असताना, त्याचप्रमाणे दरडोई खर्चाच्या निकषाच्या बाहेरील योजनांचे प्रस्ताव तयार करीत असताना,**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद** यांनी पुढील बाबींची दक्षता घ्यावी.

**१) प्रकल्पित लोकसंख्येची गणना :**

अ) गावाची सध्याची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणेवर आधारी असावी.( सन २०११ च्या जनगणेची अंतिम आकडेवारी उपलब्ध नसल्यास तात्पूरती आकडेवारी विचारात-घ्यावी.)

ब) पिण्याच्या पाण्याची प्रकल्पित गरज/लोकसंख्या वाढ ही पारंपारिक/विहीत पद्धतीनुसार निर्धारित करण्यात येते. मात्र, लोकसंख्येमध्ये होणारी वाढ ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती / कल, लोकसंख्या वाढीशी निगडीत असलेल्या बाबी विचारात न घेता निश्चित केल्यास, एकतर मोठ्या योजनांचे (आर्थिकदृष्ट्या न परवडणा-या) किंवा कमी क्षमतेच्या योजना तयार होऊ शकतात,ज्यामुळे काही महिन्यांतच अतिरिक्त योजना घेणे भाग पडू शकते.

उदा. शहरालगतच्या गावांमध्ये (Peri-Urban Areas) दशकातील लोकसंख्या वाढीचा दर हा ४०० टक्के असु शकतो आणि जर अशा गावांसाठी प्रकल्पित लोकसंख्या वाढीचा दर हा अलिकडील लोकसंख्यावाढीचा विचार न करता , पारंपारिक पद्धतीने ठरविण्यात आला, तर ही योजना निश्चितच संबंधित गावासाठी पुरेशी ठरणार नाही.

त्याचप्रमाणे काही वाडी / वस्त्यांमध्ये लोकसंख्येचे प्रमाण हे वाढण्याऐवजी कमी झाल्याचे दिसून येते. अशा वाडी / वस्तीसाठी देखील पारंपारिक पद्धतीने लोकसंख्या वाढ निश्चित करुन योजना प्रस्तावित केल्यास ती त्या वाडी / वस्तीस आर्थिकदृष्ट्या न परवडणारी ठरू शकेल. यासाठी योजनांचे प्रस्ताव सादर करताना, सध्याची लोकसंख्या, गावाच्या लोकसंख्येच्या वाढीचा दर, वास्तविकता इ.बाबी काटेकोरपणे विचारात घेण्यात याव्यात.

**२) उद्‌भवाची प्रमाणपत्रे :**

अ) अनेक योजनांच्या प्रस्तावांमध्ये उद्भवाची प्रमाणपत्रे ही ४ ते ५ वर्षे जुनी असल्याचे दिसून येते. मात्र उद्भवाची प्रमाणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत चालू वर्षातील किंवा चालू वर्षाच्या जवळपासची असणे आवश्यक आहे. अन्यथा ४ ते ५ वर्षापुर्वी दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे योजनांची कामे केल्यास घेतलेले उद्भव कोरडे ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ब) अनेक योजनांच्या उद्भवांचे प्रमाणपत्र हे उद्भवांना प्रत्यक्ष स्थळ भेटी न देता तसेच प्रमाणपत्र कोणत्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन देण्यात आले आहे याचा कोणताही उल्लेख न करताच दिले जात असल्याचे आढळून आले आहे. सदर विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने या सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन सुधारणा करावी.

क) त्याचप्रमाणे योजनांच्या प्रस्तावांमध्ये दोन स्त्रोत प्रमाणपत्र असल्याचो सुध्दा दिसून आले आहे.(एक स्त्रोत प्रमाणपत्र प्रस्तावात तर नस्तीवर दुसरेच स्त्रोत प्रमाणपत्र). ही बाब कोणत्याही परिस्थितीत स्विकारार्ह राहणार नाही.अशी परिस्थिती दिसून आल्यास संबंधितास जबाबदार धरुन त्याची गंभीर दखल घेण्यात यावी.

**३) अस्तित्वातील उद्‌भव/एकापेक्षा जास्त योजना अस्तीत्वात असलेली गावे :**

गावातील अस्तित्वातील योजनांची माहिती व्हावी यासाठी, नळ योजनेच्या प्रत्येक प्रस्तावासह ९६+ रकाना मधील माहिती सोबत जोडण्यात यावी. यामुळे गावामधील अस्तित्वातील योजनांची माहिती मिळू शकते.अनेक गावांमध्ये एकापेक्षा अधिक योजना आहेत.गावातील अस्तित्वातील उद्भव / योजना यांची सद्यस्थिती, त्या बंद असल्यास, त्याची कारण मिमांसा जसे की, योजना जुनी झाली आहे काय, वीज बीलांची थकबाकी आहे काय, नवीन योजना कशी उपयोगी ठरणार आहे, या बाबींचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन केल्याशिवाय अशा गावांसाठी नवीन योजनांचे प्रस्ताव स्विकारण्यात येऊ नयेत.

**४) आर्थिक शाश्वतता /गणना :**

अ) प्रस्तावित नळ पाणी पुरवठा योजनांच्या पाणीपट्टीचे दर व त्यापासून प्राप्त होणारा महसूल यांचे पुर्वानुमान चालू वर्षापासून पुढील १५ वर्षांची प्रकल्पित लोकसंख्या विचारात घेऊन करण्यात आले असते. त्यामुळे १५ वर्षानंतरच्या लोकसंख्येच्या आधारे निश्चित केलेले वार्षिक पाणीपट्टीचे दर कमी असतात व त्यामधून योजनेच्या देखभाल-दुरुस्तीचा खर्च भागविणे शक्य होत नाही. कारण, प्रत्यक्षात ही लोकसंख्या १५ वर्षानंतरची असल्याने. योजना कार्यान्वित झाल्यापासून नियोजन केल्यानुसार पाणी पट्टीची वसूली होणे शक्य नाही, त्यामुळे योजना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. त्यासाठी प्रस्तावित नळ पाणी पुरवठा योजनांच्या पाणीपट्टीचे दर व त्यापासून प्राप्त होणारा महसूल यांचे पुर्वानुमान गावाच्या चालू वर्षाच्या लोकवसंख्या व कुटुंबांच्या आधारेच करण्यात यावे . त्यामध्ये टप्प्या टप्प्याने वाढ प्रस्तावित करण्यात यावी.

ब) त्याचप्रमाणे, पाणीपट्टीची कुठेही १०० टक्के वसूली होत नाही. संबंधित गाव / वाडी / वस्ती व तेथील लोकांची परिस्थिती यानुसार ती किमान ३० टक्के ते जास्तीत जास्त ८५ टक्के असू शकते. त्यामुळे पाणीपट्टी वसुलीचे अवास्तविक अंदाज विचारात घेतल्यास, योजना पहिल्या वर्षापासून निकामी ठरू शकतात.सबब पाणी

पट्टीची आकारणी व वसुलीचे अंदाज वस्तुनिष्ठ आहेत, याची खातरजमा **मुख्य कार्यकारी अधिका-यांनी** करावी.

**५) पाणीपट्टीचे दर :**

अ) आदिवासी भागातील किंवा अतिमागास भागातील छोट्या छोट्या वाड्या / वस्त्या वगळता अन्य गावांमध्ये पाणी पट्टीचे दर प्रति कुटंब / प्रति दिन रु.३/- पेक्षा कमी असता कामा नयेत. (याची तुलना मोबाईल फोन्सच्या दरांशी केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होईल)

ब) प्रस्तावित योजनेत पाणीपट्टीचे दर कमीत कमी सुचविलेले असतात.कारण सुरवातीच्या वर्षात या कमी दरात योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी असते.मात्र पाणीपट्टीची भविष्यातील आकारणी व वसुली याबाबत अवास्तव अंदाज केले जातात व प्रत्यक्षात तसे घडत नसल्यामुळे योजना पुढे आर्थिकदृष्ट्या न परवडणारी ठरू शकते,याकडेही **मुख्य कार्यकारी अधिका-यांनी** लक्ष देणे आवश्यक आहे.

क) त्याचप्रमाणे पाणीपट्टीच्या वसूलीतून प्राप्त होणारा अतिरिक्त महसूल हा भविष्यकालीन निधी (Sinking Fund) मध्ये ठेवता येईल.त्याचा उपयोग भविष्यात आकस्मिकरित्या उद्भवणा-या दुरुस्त्यांसाठी तसेच, द्रव व घन कचरा व्यवस्थापनाच्या कामांकरिता होऊ शकेल.

**६) स्त्रोतांचे बळकटीकरण / शाश्वतीकरण (भूगर्भिय तसेच भूपृष्ठिय):**

नळ पाणी पुरवठा योजनांच्या स्त्रोतांचे बळकटीकरण , संवर्धन व त्यांची सुधारणा सातत्याने करणे गरजेचे आहे. स्त्रोतांचे बळकटीकरण म्हणजे केवळ त्यांचे बांधकाम असा मर्यादित अर्थ अभिप्रेत नाही, तर उद्भव प्रदुषित होण्यापासून प्रतिबंध करणे, स्त्रोताची पाणी साठवण क्षमता व संवर्धनता वाढविणे, भूपृष्ठावरील स्त्रोतांच्या बाबतीत स्त्रोतांमधील गाळ काढणे इत्यादी बाबीदेखील त्यात अभिप्रेत आहेत. स्त्रोतांच्या शाश्वतीकरणाची गरज नाही, असे म्हणणे ही पुर्णपणे चुकीची कल्पना आहे. स्त्रोत बळकटीकरण/शाश्वती यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) किंवा अन्य कार्यक्रमातून निधी उपलब्ध होणे शक्य आहे.

**७) भुपृष्ठीय नकाशे :**

अ) योजनांच्या प्रस्तावांसह सादर होणा-या नकाशांमध्ये टोपो-शीट्स (ज्यामध्ये उद्भव व पाऊपलाईन्स दर्शविण्यात आलेल्या आहेत) तसेच गुगल मॅप्स रेखांकनाचा समावेश असावा.

ब) ज्याठिकाणी एखादी चालू स्थितीतील किंवा बंद स्थितीतील योजना अस्तित्वात आहे, अशा प्रकरणी, प्रस्तावांतील नकाशांवर विशिष्ट रंगांद्वारेअस्तित्वातील योजना व प्रस्तावित उपांगे (त्यातील टाक्या,मुख्य वाहिनी ,गुरुत्व वाहिनी,प्रक्रिया केंद्र,वितरण व्यवस्था इत्यादी) ठळकपणे दर्शविण्यात यावेत.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असू त्याचा संगणक सांकेतांक २०१२०७१९१५२३५०१८००असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(र.अं.खडसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती,पापु-०७